प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत स्वतंत्र झाला. या स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर अनेक राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व साहित्यिक स्थित्यंतरे घडून आली. दुसरे महायुद्ध, महात्मा गांधींची हत्या, भारताचे लोकशाही प्रजासत्ताकातील पदार्पण, आंबेडकरांचे धर्मांतर यासारख्या ठळक घटनांनी तो काळ गाजला. मराठी साहित्याच्या दृष्टीनेही हा काळ अत्यंत वेगळा असा होता. एकीकडे मर्ढेकर, शरदचंद्र मुक्तिबोध, कुसुमाग्रज, खांडेकर, बेडेकर, फडके ही मंडळी पांढरपेशी मध्यमवर्गीयांच्या दु:खांना, भावभावनांना, समस्यांना आपल्या साहित्यातून वाचा फोडत होती तर दुसरीकडे माडगुळकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांच्यासारखे लेखक ग्रामीण साहित्याच्या रोपट्याला ग्रामीणतेच्या संस्कारांचे पाणी पाजण्याच्या कामाला लागली होती. ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात लाचार अवस्थेत खितपत पडलेला भारतीय माणूस भारतीय स्वातंत्र्याने मुक्त झाला खरा, पण धर्म आणि जात यांच्या अनादिकाळापासूनच्या पगड्यातून मात्र तो मुक्त झाला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातही दलित, अस्पृश्य समाज या वर्णव्यवस्थेचे चटके खातच होता. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या प्रज्ञावंत विचारवंताने त्यांच्या मनातील संकुचित मनोवृत्तीची कवाडे सताड उघडी केली आणि त्यांना आत्मविश्वासपूर्वक स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजावून दिला, म्हणूनच या भारतीय स्वातंत्र्याला 'कुठल्या गाढवीचं गाव' 'संशयास्पद भगोष्ट' असे म्हणण्याचे धाडस त्यांच्या अंगी आले.

''आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वत:ला आणि स्वत:भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार असणाऱ्या दलित साहित्याची''[१] मुळ प्रेरणाच इतकी शक्तीशाली होती की त्यामुळे दलित साहित्य १९६० च्या दरम्यान मोठ्या त्वेशाने मराठी साहित्याच्या उंबरठ्यावर आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी सज्ज झाले. कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन, नाटक यांच्या सहाय्याने दलित साहित्याने दलित-अस्पृश्यांच्या अनंत अनादि काळापासूनच्या व्यथा-वेदनांना, दु:खांना, अन्याय, अत्याचारांना वाचा फोडली. कृत्रिमतेचा मागमूसही नसलेले अनुभवसंपन्न दलित साहित्य चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेवर, जातियतेवर, धर्मांधतेवर आपल्या विचारांचे आसूड ओढू लागले. असं असलं तरी दलितांनी घेतलेला हा सूड नव्हता तर ही माणुसकीची लढाई होती. म्हणूनच डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, '' 'मानवत्त्वाची प्रतिष्ठा' हे सर्वश्रेष्ठ मूल्य शिरोधार्थ मानणाऱ्या एका विराट आंदोलनातून दलित साहित्य जन्मलेले आहे. दलित साहित्य हे सूडवाद्यांचे साहित्य नव्हे तर ते 'माणुसकी'साठी लढणाऱ्यांचे साहित्य आहे.''[२] म्हणूनच अस्पृश्यतेशी, दास्याशी, विषमतेशी, दु:खाशी दलित साहित्याचे वैर आहे.

पहिल्या पिढीची वेदना, दुसऱ्या पिढीचा विद्रोह आणि तिसऱ्या पिढीचा बुद्धपुरस्कृत मानवतावाद यांच्या संयोगातूनच दलित साहित्य खऱ्या अर्थाने अस्तित्वसिद्ध झाले आहे. भावी काळात होणाऱ्या सम्यक क्रांतीचे नेतृत्त्व या साहित्याने स्वीकारले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयीने दलित साहित्यावर विशेष प्रभाव पाडला आहे. ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.'' या विचारधारेने

प्रभावित झालेला दलित लेखक जीवनातील अंतर्विरोधाची भेदक समीक्षा करीत जीवनाच्या उन्नयनाच्या वाटा मोकळ्या करण्याच्या प्रतिज्ञेतून आपल्या दु:खांना, अनुभवांना, पिळवणूकीला, अत्याचाराला दलित साहित्यात स्पष्ट शब्दात नमूद करू लागला.

दलित साहित्याने मराठी साहित्यात एक वैचारिक वादळ निर्माण केले. नवे थक्क करून सोडणारे अनुभव या साहित्यातील कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथनाच्या पानापानातून पाझरु लागले. सर्वसामान्य माणसांच्या दु:खापेक्षा दलितांच्या दु:खांची कक्षा खूप मोठी होती. त्या दु:खांना दलित साहित्याने निसंकोचपणे वाचा फोडली. डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रेरणेने प्रभावित झालेला दलित लेखक आपल्या भूकेची आणि अस्मितेची चाके संस्कृतीच्या दाढेतून कर्णाच्या जिद्दीने बाहेर काढू लागला. त्याच्या या जिद्दीतूनच दलित साहित्याचे वादळ गेली पन्नास-पंचावन्न वर्षांपासून मराठी साहित्यात घोंगावते आहे, नवी आव्हाने स्वीकारत आहे, आपले दडपले गेलेले अस्तित्व सिद्ध करत आहे.

प्रस्तुत प्रबंधात एकूण दलित कादंबरीच्या दृष्टिकोनातून सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीचा अभ्यास केला आहे. या प्रबंधातील पहिले प्रकरण हे दलित कादंबरीचे स्वरूप व वाटचाल स्पष्ट करणारे आहे. पाश्चिमात्य साहित्यातून आलेला 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यातही चांगला रूळला. आधुनिक कालखंडातील वाचकांच्या सर्वाधिक आवडीचा साहित्यप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहिले जाऊ लागले. व्यापक जीवनाभूतीची अभिव्यक्ती आणि वास्तवाशी असणारे नाते हेच 'कादंबरी' वाङ्मयाचे मुख्य वैशिष्ट्य होय. कौटुंबिक, सामाजिक, मानसिक,

भावनिक, राजकीय, ऐतिहासिक, संज्ञाप्रवाही, मनोविश्लेषणात्मक अशा अनेक प्रकारचे विषय 'कादंबरी' वाङ्मय हाताळताना दिसतो. त्यामुळे कादंबरीत विषय-वैविध्यता दिसते. कथानक, स्वभावरेखन, मनोविश्लेषण, वातावरण, भाषाशैली, संवाद, शैली इ. घटकांचा समावेश कादंबरीत दिसून येतो. वाचकांना झपाटून टाकणारा हा वाङ्मयप्रकार आहे.

दलित लेखकांनी 'दलित कादंबरी' हा वाङ्मयप्रकार दलित कविता, कथा, आत्मकथन, नाटक या वाङ्मयप्रकारांपेक्षा सखोल आणि विस्तृतपणे हाताळलेला नाही. खरं म्हणजे शतकानुशतके दु:ख भोगत आलेल्या दलितांच्या दु:खांना विस्तृतपणे मांडण्यासाठी इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार फारच चांगला पर्याय आहे. पण काही अपवाद वगळता या वाङ्मयप्रकारात म्हणावी तितकी प्रगती झाली आहे असे म्हणता येत नाही. आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे, नाहक लादलेल्या गुलागिरीचे, पूर्वपिढ्यांच्या विनाशाचे, सहन केलेल्या दु:खांच्या जळजळीचे, वेदनेचे चित्रण दलित लेखकाने आपल्या लेखनातून तीव्रपणे व आवेगपूर्ण रीतीने कादंबरीतून मांडायला हवे होते पण गेल्या पन्नास-साठ वर्षात काही दलित कादंबरीकार सोडले तर इतर दलित लेखकांनी कथा-कविता-आत्मकथन याच वाङ्मयप्रकारांना जवळ केल्याचे दिसून येते. दलितेतर कादंबरीकारांनी मात्र दलितांच्या जीवनावर आधारित असणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत; पण त्यातून प्रत्ययास येणारे 'दलित जीवन' हे सहानुभूतिपूर्वक आणि वरवरचे आहे यालाही मधु मंगेश कर्णिक, वि. स. खांडेकर, रणजित देसाई इत्यादींचे अपवाद आहेत. दलित कादंबरीकारांनी मांडलेला जीवनानुभव हा दाहक आणि विचारप्रवर्तक आहे. यातूनच दलित कादंबरीचे वेगळेपण दिसून येते.

वेदना ही विद्रोहाची जननी असल्याने दलित साहित्याचे अंगभूत वैशिष्ट्य म्हणून वेदनेकडे पाहिले जाते. वेदनेविरुद्धचा असंतोष पुढे विद्रोहात रुपांतरित होत असतो. १७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, बंधुता ही जीवनमूल्ये दिली. या क्रांतीने मानवाच्या मुक्तीची कवाडे खऱ्या अर्थाने उघडी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच जीवनमूल्यांना आदर्श मानून 'दलित विद्रोहा'चे शस्त्र हाती घेतले. या विद्रोहाला सामाजिक बांधिलकीचे भान आहे. हा विद्रोह विश्वात्मक, विज्ञाननिष्ठ व विवेकनिष्ठ आहे. नीतीच्या आणि मानवतेच्या प्रस्थापनेसाठी युद्धप्रेरणा देणारा हा विद्रोह विध्वंसक नसून विध्वंसक मूल्यांविरुद्ध लढा देणारा आहे. हा विद्रोह 'नकारा'तून येतो. हा नकार केवळ नकार नसून स्वीकारार्ह नकार आहे. सामाजिक व आर्थिक विषमता, दारिद्र्य, अज्ञान, गुलामी, जातिभेद, अंधश्रद्धा या सर्वांविरुद्ध असणारा नकार स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता इ. ना तो जवळ घेणारा आहे. हा नकार चातुर्वर्ण्यव्यवस्थेला छेद देताना एका नव्या जीवनव्यवस्थेची मांडणी करतो. माणसाला माणूस म्हणून न स्वीकारणाऱ्या पाखंडी प्रवृत्तीविरुद्ध हा नकार, विद्रोह आणि ही वेदना दलित कादंबरीतून उद्गुक्त होताना दिसते. त्याचबरोबर भगवान बुद्धांच्या विचारसरणीवर आधारित असणारा 'बुद्धपुरस्कृत मानवतावादही' दलित कादंबरीचे अंगभूत वैशिष्ट्य मानला जातो. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बुद्धांच्या 'सम्यक' विचारांनी प्रभावित झालेले दिसतात. म्हणूनच बुद्धांचा मानवतावाद दलित कादंबरीच्या पाना-पानातून डोकावताना दिसतो.

दलित साहित्यनिर्मितीच्यामागे एक प्रचंड सामाजिक-सांस्कृतिक स्फोट आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील दलित कादंबरीच्या वाटचालीचा विचार करता या सुरवातीच्या

काळातील सामाजिक जडणघडणीचा आविष्कार झालेला दिसून येतो. सुरुवातीची कादंबरी ही पहिल्या पिढीची वेदना आविष्कृत करते. दलित-अस्पृश्यांच्या कोंडलेल्या मनाचा एक भावनिक स्फोट या पहिल्या पिढीतील कादंबरीकारांच्या कलाकृतीतून दिसून येतो. आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे हे या पहिल्या पिढीतील दलित कादंबरीकार. तर दुसऱ्या पिढीतील लेखकाने विद्रोहाचे शस्त्र हाती घेऊन त्यांच्या कादंबऱ्यांतून सामाजिक संघर्षाचे चित्र उभे केले. बाबुराव बागुल, केशव मेश्राम, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर, विजय शिरसट यांसारखे लेखक दलितविद्रोह मांडताना दिसतात. तिसऱ्या पिढीतील लेखकांनी मात्र वेदना, विद्रोह तर मांडलाच पण त्याचबरोबर बुद्धपुरस्कृत मानवतावादालाही आपल्या कादंबरीचा अविभाज्य घटक बनविला. सुधाकर गायकवाड, विजय काळे, योगेंद्र मेश्राम, बाबुराव गायकवाड, यशवंत मनोहर, शशिकांत तासगावकर यांनी आपल्या कादंबऱ्यांतून बुद्धांचा मानवतावाद मांडला आहे.

गावकुसाबाहेरचे वाळलेले, पिचलेले, विस्कटलेले जीवन दलित समाज शतकानुशतकापासून सहन करीत आला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या मनामध्ये निर्माण केलेली अस्मिता, स्वाभिमान; यातून आत्मबल आलेला दलितलेखक समाजाच्या दु:खाचे चित्रण आपल्या कादंबरीतून करू लागला होता. मानवी अस्तित्वाचे अन्नक्षुधा आणि कामक्षुधा हे दोन अविभाज्य घटक आहेत. त्यापैकी अन्नक्षुधा म्हणजेच 'भूक' या शब्दाभोवतीच मानवाच्या अस्तित्वाचा संघर्ष सुरू आहे. दलित कादंबरीत या भूकेचे व पर्यायाने होणाऱ्या उपासमारीचे चित्रण दलित कादंबरीकाराने समर्थपणे मांडले आहे. अज्ञानाच्या, अंधाराच्या खोल दरीत

खितपत पडलेला दलित समाज अस्पृश्यतेचे चटके अनादिकाळापासून निमूटपणे सहन करीत होता. गावकुसाबाहेरचे उपेक्षित जीवन जगत आलेला हा अस्पृश्य समाज चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या उतरंडीखाली चिरडून, गुदमरून गेला होता. या अस्पृश्यतेचे चित्रणही दलित कादंबरी समर्थपणे करताना दिसते.

दलितकादंबरीतील व्यक्तिरेखा या आपआपल्या दु:खदैन्याच्या माध्यमातून संपूर्ण दलित समाजाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. त्यातील नायकाचे दु:ख, दैन्य, दास्य हे वैयक्तिक त्याचेच नसते तर अखिल दलित समाजाचे दु:ख त्याच्या माध्यमातून प्रकट होताना दिसते. या समाजातील स्त्रीचे जीवन तर अधिकच दयनीय व हालाखीचे आहे. अज्ञानाच्या घोर अंधारात आपल्या अस्तित्वाचा शोध घेणेही तिच्यासाठी अपरिचित आणि अनाकलनीय आहे. या त्यांच्या दु:ख-दैन्याला वाचा फोडण्याचे काम दलित कादंबरी करते. बऱ्याचशा दलित कादंबऱ्या ग्रामीण जीवनजाणिवांच्या पार्श्वभूमीवर अवतीर्ण होताना दिसतात. गाव, गावची संस्कृती, रूढी-परंपरा, ग्रामीण मानसिकता, बलुतेदारी-अलुतेदारी पद्धत, कृषिप्रधान जीवन यासर्वातून दलित कादंबरी अस्तित्वात येताना दिसते.

दृश्यात्मक पद्धतीने निवेदन करून एखादा प्रसंग जिवंत करणे हे दलित कादंबरीचे स्वभाववैशिष्ट्य आहे.दलित कादंबरीकाराची भूमिका ही एखाद्या आदर्श प्रेक्षकाची किंवा सुत्रधाराची असते. प्रसंगानुरूप पात्रनिर्मिती करून दलित लेखक कादंबरीचे विश्व उभे करत असतो. भाषाशैली, निवेदनपद्धती, कादंबरीतील संघर्ष यात विविध प्रयोग करून कादंबरीतील पात्रांचें मानसिक द्वंद्व टिपून वाचकाला उद्विग्न करून सोडणे आणि त्याचे अनुभवविश्व समृद्ध करणे हे दलित कादंबरीचे

स्वभाववैशिष्ट्य आहे. अशा प्रकारे पहिल्या प्रकरणात एकूण दलित कादंबरीचे स्वरूप व वाटचाल यांच्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत प्रबंधातील दुसऱ्या प्रकरणात मराठी साहित्यातील दलित कादंबरीचा विकास या कादंबऱ्यातील महत्त्वाच्या साहित्यकृतींच्या अनुषंगाने त्यांचा परामर्श घेतला आहे. त्यांच्या अनुषंगाने सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. दलित समाजातून पुढे आलेला संवेदनक्षम मनाचा माणूस दलितेतर कादंबऱ्यांमध्ये त्याचे सत्यचित्र कुठेच नाही हे पाहून आश्चर्यचकित झाला होता. आपले जीवनही कादंबरीचा विषय होऊ शकते या जाणिवेतून तो कादंबरी लिहू लागला होता.

स्त्रियांना दुय्यम स्थान असणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांचे शोषण केले जात आहे. त्यातही दलित स्त्रियांची स्थिती अत्यंत भयावह आहे. 'सूड' या बाबुराव बागुल यांच्या कादंबरीत 'जानकी' नावाच्या स्त्रीची अवस्थाही याला अपवाद नाही. मुळात 'स्त्री' म्हणून जगू न इच्छिणाऱ्या जानकीचे चित्रण करणारी ही कादंबरी स्त्री-पुरुष संबंधाबद्दलच्या सनातन प्रश्नाला हात घालताना दिसते. स्त्रीवर्गाचे प्रातिनिधिक रूप असणारी 'जानकी' संपूर्ण दलित समाजातील स्त्रीदु:खाचा आविष्कार करते. बाबुराव बागुल यांनी समाजव्यवस्था आणि संस्कृती यांच्या संचिताची विकृती 'सूड' या कादंबरीतून मांडली आहे. बौद्ध धर्माची दिक्षा घेतल्यानंतर पूर्वापार चालत आलेली कामे सोडल्याने नवबौद्धांना दिलेल्या वागणूकीचे चित्रण भीमसेन देठे यांची 'इस्फोट' ही कादंबरी करते. जग कितीही बदलले तरी मानवी संकुचितवृत्ती एकविसाव्या शतकातही बदलणार नाही याचे चित्रण करणारी ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आणि दखलपात्र आहे.

जातीयता या दलितांच्या समस्येवर लक्ष केंद्रित करणारी माधव कसबे यांची 'नकुल' ही कादंबरी. दोन पिढीतील विचारांची भिन्नता शब्दबद्ध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान नवतरूणात कसा बदल घडवून आणते याचे प्रत्यंतर केवळ कलेच्या माध्यमातून करण्यापेक्षा माधव कसबे यांनी वास्तववादी भूमिकेतून अधिक चांगल्या प्रकारे केले आहे. बा. स. हाटे यांची 'युगविधान' ही कादंबरी तिचा विषय, मांडणी, व्यक्तिरेखा, कथानक आणि वातावरण या सगळ्या दृष्टीने वेगळी ठरते. अनेक व्यक्तींच्या जीवनानुभवातून आणि जीवनमरणाच्या संघर्षातून त्या युगासंबंधीचे एक वास्तवदर्शन ही कादंबरी करते. केशव मेश्राम यांची 'हकिकत आणि जटायू' ही कादंबरी पुराणकाळातील कथेचा धागा पकडून 'जटायू' मधील अभिमनचा जीवनसंघर्ष मांडते. पुराणकाळातील जटायूचे पंख छाटून त्याला घायाळ केले जाते. तो धागा पकडून लेखक अभिमनच्या अगतिकतेचे दर्शन घडवताना दिसतात.

वरील सर्व कादंबऱ्या आणि 'शूद्र' या कादंबरीत बरेच साम्यभेद आहेत. 'शूद्र' मध्ये आपल्यावर लागलेला अस्पृश्यतेचा डाग पुसण्याची अविरत धडपड सुधाकर गायकवाड चित्रित करतात. शूद्रांच्या मनात असणारा अन्याय, संघर्ष, दास्यत्व झुगारण्याची ताकद सुधाकर गायकवाड यांनी समर्थपणे या कादंबरीत व्यक्त केली आहे. शूद्राशूद्र हा भेदभाव कधीही न संपणारा आहे. मानवी अस्तित्व जोपर्यंत टिकून राहील तोपर्यंत उच्चनीच हा भेदभाव राहील या भावनेने 'शूद्र' चे लिखाण झालेले दिसते.

या प्रबंधातील तिसऱ्या प्रकरणात 'शूद्र' या कादंबरीतील अनुभवांच्या समाजिकतेवर प्रकाश टाकला आहे. 'शूद्र' मधील अनुभव हा एकट्या नागनाथचा

नसून त्या काळातील अस्पृश्यांचे ते अनुभव आहेत. या कादंबरीच्या लिखाणावर आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. नागनाथमधील विद्रोह याच विचारांची देणगी आहे. 'शूद्र' मधील भूकेचे चित्रण पाहताना तत्कालीन जातीयतेचे स्वरूपही लक्षात येते. पोट भरण्यासाठी प्रसंगी मरण स्वीकारण्याची वेळ यातील लोकांवर येताना दिसते. अन्याय, अत्याचार, पिळवणूक, दास्य, जातीयता, अस्पृश्यता यासारख्या दलितांच्या प्रश्नांचा प्रभावी आविष्कार या कादंबरीत दिसून येतो. अस्पृश्य जाणिवेचे वेधक चित्रण 'शूद्र' मध्ये येते. अस्पृश्यतेचा डाग पुसण्यासाठी नागनाथ मृत्यूच्या शेवटच्या श्वासापर्यंत झगडतो. पण तरीही त्याला त्यात यश येत नाही. विषम समाजरचना, धर्मांधता, आचार-विचारांची पद्धत, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढीपरंपरा, रीतिरिवाज, दारिद्र्य, हेवेदावे या सर्वांचे चित्रण 'शूद्र' या कादंबरीतील समाजजीवनातून वाचकांच्या समोर येते. या कादंबरीतील समाज चातुर्वर्ण्यसमाजरचना प्रमाण मानणारा आहे. असे असतानाही या कादंबरीत समूहभावनेचे चित्रणही येते. आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध हा समाज बंड करतो ते या समूहभावनेच्या प्रेरणेनेच होय.

या प्रकरणात 'शूद्र' मधील अंधश्रद्धेचे चित्रणही विशद केले आहे. दलित - अस्पृश्यांमध्ये अंधश्रद्धेचे स्तोम माजविण्यात हा उच्चवर्णीय समाजच कारणीभूत आहे. प्रस्थापित परंपरा आणि संस्कृती यांना बळी पडलेली दलित स्त्री स्वत:हून कोणत्याही दुष्कृत्यास बळी न जाता जबरदस्तीने, नाईलाजाने आणि नाखुशीने आपल्या कुटुंबासाठी परिस्थितीस शरण जाते. एकूणच 'शूद्र' या कादंबरीतील स्त्रीजीवन सुधाकर गायकवाड यांनी परिणामकारकरित्या चित्रित केले आहे. दलितांच्या

कोणत्याही कृत्याचा राग तत्कालीन अबला स्त्रीवरच का काढला जातो ? हा प्रश्न लेखक उपस्थित करतात. याचबरोबर लेखकाने उच्चवर्णीयांचा अस्पृश्यांवरील होणारा अन्याय आणि दलितांची अगतिकता या कादंबरीत मांडली आहे. कर्मकांड, देवधर्म, रूढीप्रियता इ. अनिष्ट प्रथांनी उच्चवर्णीयांनी वर्षानुवर्षे दलितांची कशी गळचेपी केली आहे, याचे चित्रणही या कादंबरीत येते. या अन्याय-अत्याचाराला प्रतिकार करण्याचे धाडस दलितांच्या मनाला स्पर्शूही शकत नसल्याने दलित-अस्पृश्य मन अगतिक झाल्याशिवाय राहत नाही. ज्ञानापासून वंचित असणाऱ्या अस्पृश्याला विज्ञानवादी दृष्टिकोन स्पर्श करणे तत्कालीन काळात शक्य नव्हते. त्यामुळे हा दलित उच्चवर्णीयांच्या अन्यायाला बळी पडलेला दिसून येतो.

बौद्धतत्त्वज्ञानावर भाष्य करणारी कादंबरी म्हणूनही सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' कडे पाहिले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेल्या बौद्धधम्माची तत्त्वप्रणाली दलित लेखक आपल्या साहित्यातून अनुसरू लागला. बुद्धाचा शांतीचा-अहिंसेचा मार्ग अनात्म, अनिश्वरवादीही आहे. बौद्ध धर्म हा शुद्ध नैतिक आचाराचा धर्म आहे. 'शूद्र' मधील नागनाथला जेव्हा सब्बबुद्ध भिक्कू भेटतात तेव्हा बौद्धतत्त्वज्ञानाची प्रचिती ते नागनाथला करून देतात. सब्बबुद्ध भिक्कूंकडून बौद्धधर्माची दिक्षा घेतल्यानंतर नागनाथचे 'विश्वानंदा'मध्ये रूपांतर होते. तो बौद्धधम्मातील आचार-विचार अनुसरू लागतो. पण राजाच्या सैन्याकडून जेव्हा बौद्ध भिक्कू मारले जातात तेव्हा नागनाथ पुन्हा शस्त्र हाती घेतो. नागनाथची ही भूमिका खरं म्हणजे वरवर पाहता पटत नाही, कारण आपले अवघे कुटुंब, समाज राजाकडून मारले असताना सूडाने पेटलेला नागनाथ सब्बबुद्ध भिक्कूकडून, त्यांच्या

तत्त्वज्ञानाकडून, त्यांच्या आचारविचाराकडून प्रभावित होतो आणि बौद्ध धर्म स्वीकारतो असे असताना सब्बबुद्ध भिक्कू मारले गेल्यावर मात्र तो पुन्हा शस्त्र हातात घेण्याचे धाडस करतो. येथे अंगुलीमाल डाकू आणि बुद्धाच्या गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. अंगुलीमाल डाकू बुद्धाला शरण आला होता. परंतु लोकांनी त्याला डाकू म्हणून जेव्हा ओळखले तेव्हा ते त्याला दगडांनी मारू लागले. तेव्हा अंगुलीमाल त्यांच्याविरुद्ध विद्रोह करताना दिसतो. येथे भालचंद्र फडके यांचे विधान यथायोग्य वाटते, ते म्हणतात, ''बुद्ध जाणिवेचे सातत्य मानतो. माणसाच्या मृत्यूनंतर त्यांची जाणीव वैश्विक जाणिवेत विलीन होते आणि त्यातून पुन्हा नव्या जिवाच्या रुपाने ती प्रगट होते.''[३] खरं म्हणजे या वैश्विक जाणिवेतूनच नागनाथच्या विद्रोहाचा पुनर्जन्म होतो. म्हणून त्याची ही भूमिका योग्य वाटते.

तसेच या प्रकरणात चातुर्वर्ण्यव्यवस्थेविरुद्धचा विरोधही स्पष्ट करण्यात आला आहे. स्वत:वर लादलेला 'शूद्र' हा कलंक समूळ नष्ट करण्याची नागनाथची प्रतिज्ञा हीच या बंडाचे निशाण आहे. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या या मनूप्रेरित समाजव्यवस्थेविरुद्ध नागनाथच्या रूपाने 'शूद्र' या कादंबरीत विद्रोहाचे, नकाराचे, विरोधाचे चित्रण झाले आहे. अशा प्रकारे तिसऱ्या प्रकरणात 'शूद्र' मधील अनुभवांची सामाजिकता स्पष्ट करण्यात आली आहे.

प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात 'शूद्र' या कादंबरीच्या वाङ्मयीन विशेषांचा आढावा घेतला आहे. ही कादंबरी वाचकाला अंत:र्बाह्य हादरवून सोडते. तिची अभिव्यक्ती, त्याचबरोबर तिचा विषय इतर दलित कादंबऱ्यांपेक्षा वेगळा आहे. नकार, वेदना, विद्रोह, आत्मभान, आत्मशोध या बाबी तर तिच्यात समाविष्ट आहेतच

त्याचबरोबर तिच्या आशय-अभिव्यक्तीचे स्वरूपही भिन्न आहेत. नागनाथच्या जीवनसंघर्षाबरोबर बौद्ध तत्त्वज्ञानावर भाष्य करणारी एक सुंदर कलाकृती म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. सहजसुंदर निवेदनपद्धती आणि प्रमाणभाषेचा वापर यामुळे इतर दलित कादंबऱ्यांपेक्षा 'शूद्र' चे वाङ्‌मयीन मूल्य ठळकपणे लक्षात येते. रूपक, प्रतीक, प्रतिमा याबरोबरच कारूण्य, मिस्किलपणा, उपहास यांचे बेमालूमपणे मिश्रण सुधाकर गायकवाड यांच्या निवेदनात दिसून येते. वत्तनिया नगर व वेगंयन राज्य यांची लाभलेली प्रादेशिकता 'शूद्र' चे वाङ्‌मयीन सौंदर्य खुलवण्यास मदत करते.

'शूद्र'मधील नागनाथ, सागला, नागनाथचे वडील, सब्बबुद्ध भिक्कू, ऋषिमूनी, ऋषिकन्या, विसपाल यासारख्या व्यक्तिरेखांमधून ही कादंबरी आकारास येते. मोजक्याच पण परिणामकारक पात्रांच्या सहाय्याने सुधाकर गायकवाड या कादंबरीचे वैचारिक वैभव उभे करण्यात यशस्वी झाले आहेत. 'नागनाथ' या नावावरूनच तो 'नाग' वंशीय असल्याची खात्री वाचकाला होते. प्रत्येक व्यक्तीचे नामकरण स्थळ, काल, परिस्थितीचे भान लेखकाने ठेवल्याचे दिसून येते. या कादंबरीतील कोणतीही व्यक्तिरेखा कृत्रिमरित्या कादंबरीत प्रवेश करताना दिसत नाही. ती कथानकात समरस होते. 'शूद्र' मधील वातावरण पुराण काळाच्या पार्श्वभूमीवरून पुढे सरकताना दिसते. हा कालखंड नक्की सांगता येण्यासारखा नसला तरी तो पौराणिक वातावरणाची अनुभूती देताना दिसतो.

आपल्याबरोरब असणाऱ्या शूद्रातिशूद्र लोकांना बंधमुक्तीचा मार्ग समजावून देऊन नागनाथ माणुसकीचे ध्येय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. ही एक प्रकारची लेखकाने स्वीकारलेली सामाजिक बांधिलकीच आहे.

अशाप्रकारे दलित कादंबरीतील एक सर्वांगसुंदर कादंबरी म्हणून सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीकडे पाहिले जाते.

वरील विवेचनावरून पुढील निष्कर्ष मांडता येतात.

**निष्कर्ष :**

१. आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे दलित साहित्य स्वातंत्र्योत्तर कालखंडात मोठ्या जोमाने उभे राहिले.

२. दलित साहित्य हे सुडवाद्यांचे साहित्य नाही तर ते 'माणूसकीसाठी' लढणाऱ्यांचे साहित्य आहे.

३. पहिल्या पिढीची वेदना, दुसऱ्या पिढीचा विद्रोह आणि तिसऱ्या पिढीचा बुद्धपुरस्कृत मानवतावाद अशा प्रवासातून दलित साहित्याची जडणघडण झाली आहे.

४. दलितांच्या दु:खांना विस्तृतपणे मांडण्यासाठी 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार चांगला पर्याय असतानाही 'दलित कादंबरीने' मोठी झेप घेतल्याचे दिसत नाही.

५. गौतम बुद्धांचा 'मानवतावाद' हा दलित कादंबरीचे अंगभूत वैशिष्ट्य आहे.

६. अन्नक्षुधा म्हणजेच 'भूक' या शब्दाभोवतीच मानवाच्या अस्तित्वाचा संघर्ष सुरू आहे. दलित कादंबरीत या भूकेचे व पर्यायाने होणाऱ्या उपासमारीचे चित्रण दलित कादंबरीकारांनी समर्थपणे मांडले आहे.

७. दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा एकूण दलित समाजाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. वाचकाला विचारप्रवृत्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी आहे.

८. दलित कादंबरीकाराची भूमिका ही एखाद्या आदर्श प्रेक्षकाची किंवा सूत्रधाराची असते.

९. बौद्धतत्त्वज्ञानावर भाष्य करणारी 'शूद्र' ही कादंबरी सुधाकर गायकवाड यांच्या प्रतिभेचा मुक्त आविष्कार आहे.

१०. सब्बबुद्ध भिक्कूंना मारल्यानंतर नागनाथ पुन्हा शस्त्र हाती घेतो, ही भूमिका प्रथमत: पटत नसली तरी नागनाथचा सामान्य पातळीवरून विचार केला तर ती योग्य वाटते.

११. वाचकाला अंतर्बाह्य हादरवून सोडणाऱ्या 'शूद्र' या कादंबरीच्या अभिव्यक्तीबरोबरच तिचा विषयही इतर दलित कादंबऱ्यांपेक्षा वेगळा आहे.

१२. सहजसुंदर निवेदनपद्धती आणि प्रमाणभाषेचा वापर यामुळे 'शूद्र' चे वाङ्मयीन मूल्य श्रेष्ठ ठरले आहे.

१३. या कादंबरीतील संघर्ष कथानकाला अनुसरून घडताना दिसतो. नागनाथ आपल्या अस्तित्वशोधाच्या धडपडीतून जो संघर्ष करतो त्यातूनच तो सामाजिक रूप धारण करताना दिसतो.

१४. समाजातील जातीय मानसिकता दोन भिन्न जातीचे एकत्रीकरण स्वीकारू शकत नाही. त्यामुळे या जातीय उतरंडीत अडकून पडलेल्या नागनाथची वैचारिक व भावनिक घुसमट कशी होते याकडे लेखक लक्ष वेधू इच्छितात.

# संदर्भसूची


| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. दत्ता भगत | 'दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर'<br>स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,<br>पृष्ठ क्र. ४१. |
| २. | डॉ. भालचंद्र फडके | 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह'<br>श्रीविद्या प्रकाशन, पुणे. १९७७<br>पृष्ठ क्र. १० |
| ३. | डॉ. भालचंद्र फडके | 'साहित्यमीमांसा आणि समाजदर्शन'<br>पद्मगंधा प्रकाशन, पुणे.<br>प्रथमावृत्ती २७ मार्च २००७<br>पृष्ठ क्र. १८४ |

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | Encyclopaedia Britannica | L. T. D. William Benon, Publisher London 1768 |
| २. | डॉ. कर्वे स्वाती | ''लघुकादंबरीची संकल्पना व मराठी लघुकादंबरी'' अप्रकाशित, पी.एच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे. |
| ३. | कालेलकर ना. गो. | ''भाषा आणि संस्कृती'' मौज प्रकाशन, मुंबई. दुसरी आवृत्ती १९८२ |
| ४. | कऱ्हाडे सदा | ''तप्तमुद्रा'' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. जून २००१ |
| ५. | कांबळे बळवंत | ''नापत'' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर. प्रथमावृत्ती १९८४ |
| ६. | कुलकर्णी वा. ल. | ''ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या'' आनंद यादव यांच्या ग्रंथातील मुलाखत. |
| ७. | कोंडविलकर माधव | ''अनाथ'' दिनपुष्प प्रकाशन, गिरगाव. डिसेंबर १९८१ |
| ८. | कसबे माधव | ''नकुल'' लोकसंघ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २६ सप्टेंबर १९८१ |




SHIVAJI

९. काळे विजय — ''जागृती''
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.
पहिली आवृत्ती - १९८५

१०. कसबे रावसाहेब — ''आंबेडकर आणि मार्क्स''
सुगावा प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती १९८५

११. खरात शंकरराव — ''हातभट्टी''
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती - १९७०

१२. खरात शंकरराव — ''गावचा टिनोपाल गुरूजी''
इनामदार बंधु प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती - १९७१

१३. खरात शंकरराव — ''मी माझ्या गावच्या शोधात''
प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९८३.

१४. खरात शंकरराव — ''पारधी''
मीनल प्रकाशन, कोल्हापूर.

१५. गजेंद्रगडकर श्री. न. — ''भाषा आणि भाषाशास्त्र''
व्हिनस प्रकाशन, पुणे.
दुसरी आवृत्ती - १९७९

१६. गायकवाड सुधाकर — ''शूद्र''
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
द्वितीयावृत्ती - २००५

१७. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री — ''मराठी विश्वकोश खंड ३''
म. रा. सा. संस्कृती मंडळ, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९७६

१८. जाधव मुरलीधर — ''कार्यकर्ता''
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८४

१९. जाधव ना. ब. — ''दे दान सुटे गिऱ्हाण''
मंगल प्रकाशन, नागपूर.
प्रथमावृत्ती - शके १९०१

२०. डॉ. ढगे सुशीला — ''मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल''
सुगावा प्रकाशन, पुणे. जून २००४

२१. नागराळे अमिताभ वामन — ''पड''
साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९१

२२. डॉ. नेमाडे भालचंद्र — ''टीका स्वयंवर''
संकेत प्रकाशन, पुणे, सप्टेंबर १९९०

२३. प्रा. दत्ता भगत — ''दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर''
स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

२४. दाते यशवंत - कर्वे चिंतामणी — ''महाराष्ट्र शब्दकोश'' विभाग दुसरा,
वरदा बुक्स, पुणे-१९३३

२५. देठे भीमसेन — ''इस्कोट''
संबोधी प्रकाशन, गोरगाव-मुंबई.
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९८०.

२६. देसाई रणजित — ''समिधा''
मेहता पब्लिकेशन, पुणे.
प्रथमावृत्ती - १९७९

२७. देशपांडे कुसुमावती — ''मराठी कादंबरीचे पहिले शतक''
मराठी साहित्यसंघ, मुंबई
द्वितीयावृत्ती - १९७५

२८. डॉ. धोंडगे दिलीप — ''शैलीमीमांसा'' (सिद्धांत आणि उपयोजन)
शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
जुलै २००१

२९. पवार गो. मा.-
हातकणंगलेकर म. द. — ''मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप''
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८६

३०. डॉ. फडके भालचंद्र — ''दलित साहित्य : वेदना व विद्रोह''
श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७

३१. डॉ. फडके भालचंद्र — ''साहित्यमीमांसा आणि समाजदर्शन''
पद्मगंधा प्रकाशन, पुणे-२००७

३२. बापट प्र. वा.-गोडबोले ना.वा. — ''मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास''
व्हिनस प्रकाशन, पुणे.
तिसरी आवृत्ती - १९७५

३३. बागुल बाबुराव — ''सूड''
अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७०

३४. बनसोडे हिं. गो. — ''मुक्तिसंग्राम''
अभिनव प्रकाशन, मुंबई, १९६९

३५. मराठे का. बा. — ''नावल आणि नाटक याविषयी निबंध''
मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे-१९६२

३६. मुन्शी प्रेमचंद — ''साहित्य का उद्देश''
हंस प्रकाशन, इलाहाबाद-१९५४

३७. मेश्राम केशव — ''हकिकत आणि जटायू''
पी. पी. एच. बुक स्टॉल, मुंबई- १९७२

३८. मनोहर यशवंत — ''रमाई''

३९. डॉ. यादव आनंद — ''ग्रामीण साहित्य :स्वरूप आणि समस्या''
मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे. १९८१

४०. लोखंडे अ. श्री. — ''निष्ठा''

४१. लिंबाळे शरणकुमार — ''भिन्नलिंगी''
प्रकाशक : नंदिनी तु. गवळी,
सम्राटनगर, कोल्हापूर, १९९१

४२. वाघमारे मोहन — ''आंबेडकरवादी साहित्य समीक्षा''
लुंबिनी प्रकाशन, मुंबई.

४३. व्हटकर अशोक — ''मेलेलं पाणी''
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८२

४४. शिंदे भि. शि. — ''अमृतनाक''
मयूर प्रकाशन, पुणे. १९८०

४५. संत जान्हवी — ''कादंबरी - एक वाङ्मय प्रकार''
मोघे प्रकाशन, कोल्हापूर. १९७१

४६. हाटे बा. स. — ''युगविधान''
संबोधी प्रकाशन, मुंबई-१९८३.

891.463
BAN
T15923